# बीए प्रथम वर्ष

अभ्यास पत्रिका तिसरी- निवडक कवींच्या कवितेचा अभ्यास

विषय- कवी केशवसुत यांची कविता

डॉ.नवनाथ ज्ञानोबा पोळी पवळे
कालिका देवी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शिरूर कासार

# **कृष्णाजी केशव दामले** (टोपणनाव: **केशवसुत**)

- **कृष्णाजी केशव दामले** (टोपणनाव: **केशवसुत**) ( ७ ऑक्टोबर १८६६:मालगुंड - ०७ नोव्हेंबर १९०५) हे मराठी कवी होते. मराठीत संतकाव्य आणि पंतकाव्य ही परंपरा होती. ती मोडून अन्य विषयांवर कविता करणारे केशवसुत हे आद्य मराठी कवी समजले जातात.

# आधुनिक मराठी काव्याचे जनक

- वर्षानुवर्षे एकाच विशिष्ट पद्धतीने रचल्या जाणा-या कवितेला स्वच्छंद आणि मुक्त रूपात केशवसुतांनी प्रथम सर्वांसमोर आणले. त्यामुळे त्यांना आधुनिक मराठी काव्याचे जनक संबोधले जाते.[२] आम्ही कोण?, नवा शिपाई, तुतारी, सतारीचे बोल, झपुर्झा, हरपले श्रेय, मूर्तिभंजन, गोफण या काही त्यांच्या उल्लेखनीय कविता आहेत.

# मराठी काव्यातील योगदान

- इंग्रजी काव्य परंपरेतील रोमॅण्टिक समजला जाणारा सौंदर्यवादी दृष्टीकोन प्रथम मराठी साहित्यात आणि काव्यात आणण्याचा मन केशवसुतांकडे जातो. कवीप्रतिभा स्वतंत्र असावी, कवीच्या अंतःस्फूर्तीखेरीज ती अन्य बाह्य प्रभावात ती असू नये, असे त्यांचे म्हणणे होते. काव्य हुकुमानुसार नसते, नसावे, हा वास्तववाद मराठीत त्यांनीच आधुनिक परिभाषेत मांडला. त्यांच्या काव्य विचारांवर वर्डस्वर्थ, शेली, किटस् यांसारख्या इंग्रजी कवींचा मोठा प्रभाव होता, पण त्यांची आविष्कार शैली भारतीय होती.
- इंग्रजी काव्यातील चौदा ओळींचा सॉनेट हा काव्यप्रकार 'सुनीत' या नावाने त्यांनी मराठीत लोकप्रिय केला. त्यांनी लिहिलेल्या कवितांपैकी फक्त १३५ कविताच आज उपलब्ध आहेत. पण त्यांच्या या अल्पसंख्य कवितांमध्ये अनेक विषय दिसून येतात. अन्याय, विषमता, अंधश्रद्धा, परस्पर स्नेहभाव, स्त्रीपुरुषांमधील प्रेम, त्याचबरोबर सामाजिक बंडखोरी, मानवतावाद, राष्ट्रीयत्त्व, गूढ अनुभवांचे प्रकटीकरण, आणि निसर्ग असे अनेक विषय त्यांनी सहजी हाताळले आहेत..[३]
- गोविंदाग्रज (राम गणेश गडकरी), बालकवी, रेंदाळकर यांसारखे सुप्रसिद्ध कवीसुद्धा स्वतःला केशवसुतांचे शिष्य म्हणवून घेत असत

# निर्मिती

- केशवसुतची कविता स्फुट आणि इंटरनेरॉन आहे. कवितेशी संबंधित नवीन नवीन प्रयोग आहेत. त्याचे विषय निसर्ग आणि प्रेम आहेत. त्याच्या या वृत्तीला आसपासच्या सामाजिक दु: खामुळे उत्तेजन मिळाले आणि ते कवितेमध्ये स्पष्टपणे प्रकट झाले. त्यांनी आपले क्रांतिकारक सामाजिक विचार व्यक्त केले १. तुतारी, २. नैवा शिपाई, P. पेप G.गोपान, Mur. मूर्ती भंजन इ. जोरदार आणि सारस गीतांमध्ये. स्वातंत्र्य, समानता आणि बंधुत्वाची घोषणा देऊन त्यांनी कवितेला नवा घुमा दिला. प्रेम आणि आत्मा अभिव्यक्ती हे त्याच्या कवितेचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. वैयक्तिक प्रेमावर सुमारे चाळीस प्रज्ञा लिहिणारे ते पहिले कवी होते. त्यातील १. 'प्रिय ध्यान', २. 'प्रीती', 3.. 'अपर कविता डायवट' अत्यंत संक्षिप्त रचना आहेत. त्यांच्या कवितेचे तिसरे वैशिष्ट्य म्हणजे निसर्ग. त्यांनी सूर्योदय, फुलझाडे, संध्याकाळ, परजण्यासह निसर्गाशी संबंधित सुमारे वीस गाणी केली. पुष्पप्रत उत्कृष्ट आहे. त्यांनी क्रांतीविषयी कविताही रचल्या. याशिवाय त्यांनी गूढ कविताही रचल्या. १. जपराझा, २. कोन्याकादून कोणी काडे, Har. हरपले श्रेया, ज्यात प्रेम, सौंदर्य, देवत्व, भव्यता इत्यादी रहस्ये देखील एक प्रकारचा जादूगार म्हणून प्रकट झाली आहेत.

- केशवसुतांनी व्यवस्थेत क्रांतिकारक बदल केले, त्यामुळे रचनाही झाली. ते छंदात्मक श्लोकांपेक्षा छंदात्मक श्लोकांपेक्षा अधिक अंगिकारले. त्यांनी केवळ वर्तुळातच रूढीप्रणालीचे उल्लंघन केले तसेच पाश्चात्य शैलीतील सनेटही दत्तक घेतले. त्यांच्या सुनीत रचना प्रसिद्ध आहेत. फुलपाखारू आणि सतारीचे बोल या नावाच्या वैयक्तिक अनुभवांच्या सारांचे वर्णन करणारी त्यांची प्रभावी रचना अद्वितीय आणि चवदार आहे.

# तुतारी

- एक तुतारी द्या मज आणुनि
  फुंकिन मी जी स्वप्राणाने
  भेदुनि टाकिन सगळी गगनें
  दीर्घ जिच्या त्या किंकाळीने
  अशी तुतारी द्या मजलागुनी

- अवकाशाच्या ओसाडीतले
  पडसाद मुके जे आजवरी
  होतील ते वाचाल सत्वरी
  फुंक मारीता जिला जबरी
  कोण तुतारी ती मज देईल?

- रुढी,जुलूम यांची भेसूर
  संताने राक्षसी तुम्हाला
  
  फाडूनी खाती ही हतवेला
  
  जल्शाची का?पुसा मनाला!
  
  तुतारीने या सावध व्हा तर!

- चमत्कार!ते पुराण तेथुनी
  सुंदर,सोज्वळ गोड मोठे
  अलिकडले सगळे खोटे
  म्हणती धरुनी ढेरी पोटे
  धिक्कार अशा मूर्खांलागुनी

- जुने जाऊ द्या मरणालागुनी
  जाळुनी किंवा पुरुनी टाका
  सडत न एक्या ठायी ठाका
  सावध! ऐका पुढल्या हाका
  खांद्यास चला खांदा भिडवूनी

- प्राप्तकाल हा विशाल भूधर
  सुंदर लेणी तयात खोदा
  निजनामे त्यावरती नोंदा
  बसुनी का वाढविता मेदा?
  विक्रम काही करा,चला तर!

- धार धरलिया प्यार जीवावर रडतील रडोत रांडापोरे गतशतकांची पापे घोरे क्षालायाला तुमची रुधिरे पाहिजेत रे!स्त्रैण न व्हा तर!

- धर्माचे माजवुनी अवडंबर
  नीतीला आणिती अडथळे
  विसरुनीया जे जातात खुळे
  नीतीचे पद जेथे न ढळे
  धर्म होतसे तेथेच स्थिर

- हल्ला करण्या तर दंभावर तर बंडावर
  शूरांनो! या त्वरा करा रे!
  समतेचा ध्वज उंच धरा रे!
  नीतीची द्वाही पसरा रे!
  तुतारीच्या ह्या सुराबरोबर

- नियमन मनुजासाठी,मानव
  नसे नियमनासाठी,जाणा;
  प्रगतीस जर ते हाणी टोणा
  झुगारुनी दे देऊनी बाणा
  मिरवा नीज ओजाचा अभिनव!

- घातक भलत्या प्रतिबंधावर
  हल्ला नेण्या करा त्वरा रे!
  उन्नीचा ध्वज उंच धरा रे!
  वीरांनो! तर पुढे सरा रे
  आवेशाने गर्जत हर-हर!

- पुर्वीपासुनी अजुनी सुरासुर तुंबळ संग्रामाला करिती संप्रति दानव फ़ार माजती देवावर झेंडा मिरवीती! देवांच्या मदतीस चला तर!

- धन्यवाद